दिन विशेष...
१८७९ : आधुनिक भारतातील योगीपुरुष रमण महर्षी यांचा तामिळनाडूमधील तरुच्युली या गावी जन्म.
१९७१ : प्रसिध्द भारतीय शास्त्रज्ञ विक्रम साराभाई यांचे निधन.
१९७४ : गांधीवादी नेते देशभक्त शंकरराव दत्तात्रय देव यांचे निधन.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८४,६९५.५४ -३४५.९१ (०.४१%)
डॉलर ₹ ८९.८८

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १२ |
| दिल्ली | २२ | ०८ |
| मुंबई | ३० | १९ |
| नागपूर | २८ | ११ |
| पुणे | ३० | ११ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ | वर्ष २ रे | अंक ५१ | किंमत : ५ रु. | पाने ४

**सुविचार**
स्वप्नं मोठी बघा, पण ती पूर्ण करण्यासाठी अभ्यास करा.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०४ संध्या-५:५७

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४०,६९५/- २,५८,०००/-

**केळी भाव**
नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# निवडणुकीआधीच महायुतीत मोठं बंड?

## • शिंदे सेनेचे अनेक शिलेदार ठाकरेंच्या संपर्कात?

वृत्तसंस्था । ठाणे

महापालिका निवडणुकीत उमेदवारीबाबत संभ्रम असलेले शिंदे गटातील अनेकजण उद्धव ठाकरेंच्या संपर्कात असल्याची माहिती सूत्रांनी दिली काही झाले तरी आम्ही निवडणूक लढवणारच, असा आक्रमक भाजपा-शिंदे गटातील पदाधिकाऱ्यांनी घेतल्याने शिंदेंच्या बालेकिल्ल्यातच मोठं बंड होणार असल्याची चर्चा रंगली आहे. पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील दोन्ही गटांमध्ये युती झाल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली नगर परिषदेच्या निवडणुकीत ज्यांनी धनुष्यबाणाला मतदान केले, त्यांना स्वर्गात जागा मिळणार असल्याचे अजब विधान शिंदे सेनेचे नेते शहाजीबापू पाटील यांनी केले.

### ➤निवडणुकीआधीच महायुतीत मोठं बंड?

कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघा एक दिवसाचा कालावधी उरला असताना शिंदे गट आणि भाजपाकडून अद्यापही उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आलेली नाही. यापार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांमध्ये धाकधूक सुरू झाली असून त्यातील काहींनी थेट बंडखोरीचा इशारा दिला आहे. पक्षांनी कारवाई केली तरी चालेल पण आम्ही महापालिका निवडणूक लढवणारच असल्याचा आक्रमक पवित्रा काही उमेदवारांनी घेतला आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यातच महायुतीत बंडखोरांचे चक्रीवादळ आले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपा आणि शिंदे गटाने आपापल्या प्रभागातील उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करून ठेवली आहे. दोन्ही पक्षांनी याद्या जाहीर केल्यानंतरच उमेदवारांना नामांकन अर्ज भरण्यासाठी दिले जाणार आहे. या कालावधीत कोणी बंडखोरी केली तर त्यांना विविध प्रकारची आश्वासने देऊन गार केले जाण्याची शक्यता आहे.




**शिंदेंचे अनेक शिलेदार ठाकरेंच्या संपर्कात?**

ठाणे महानगरपालिकेची निवडणूक महायुती म्हणूनच लढवली जाणार असल्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. अनेक वर्षांनी होणाऱ्या महापालिका निवडणूकांसाठी या दोन्ही पक्षातील इच्छुक उमेदवारांनी जोरदार तयारीला सुरुवात केली आहे. पक्षाकडून आपल्याला तिकीट मिळेल या आशेवर अनेकजण आहेत. परंतु महायुतीमुळे आपली उमेदवारी निश्चित होईल का याविषयी त्यांच्यात संभ्रम निर्माण झाला आहे. याच कारणामुळे शिवसेना शिंदे गटातील अनेकजण उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या संपर्कात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. ठाणे महापालिकेच्या अनेक प्रभागांवर आजवर एकसंध शिवसेनेचे (पान २ वर)

### • राज ठाकरे यांची भाजपावर टीका

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ईव्हीएमवरच भाजपाचा माज असून महापालिका निवडणुकीत त्यांचे स्वप्न गाडण्यासाठी मतदारांनी एकत्र यावे, असे आवाहन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केले. मुंबईसाठी आपण आपला राग, राजकीय मतभेद बाजूला ठेवले पाहिजे. भाजपाला मुंबई ताब्यात घ्यायची असून मुंबईसह संपूर्ण महानगर प्रदेश गुजरातला जोडायचा आहे, अशी टीकाही त्यांनी केली. राज ठाकरे यांनी आज सकाळी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला. या मेळाव्यास पक्षातील सर्व नेते, उपनेते, तसेच स्थानिक पातळीवरील गट आणि शाखा अध्यक्षांची उपस्थिती होती. यावेळी त्यांनी भाजपावर टीका करताना पक्षातील कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या कामाला लागण्याचे आदेश दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ईव्हीएमवर भाजपा निवडणुका जिंकण्याचा माज करीत असून अनेकांना त्यांच्याकडे गेलो तर तिकिट मिळेल, अशी भाबडी आशा आहे. मात्र त्यांच्याच लोकांवर तिकीट न मिळण्याची टांगती तलवार आहे, याकडेही ठाकरे यांनी नेत्यांचे लक्ष वेधले.

## थोडक्यात

### ज्यांच्यावर टीका, त्यांचीच महापौरपदासाठी मदत घेतली

**नाशिक ।** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या निर्मितीनंतर राज्यात सर्वाधिक तीन आमदार, महापालिकेची सत्ता देणाऱ्या नाशिककरांची स्वप्नपूर्ती करण्यात अपयश आल्याने पक्षाची सध्या वाताहत झाली आहे. मनसेच्या सत्ताकाळात नाशिकमध्ये चांगले काम करूनही केवळ ते लोकांपर्यंत पोहोचविण्यात अपयश आल्याने मनसेला नाशिकमध्ये भरतीनंतर ओहोटी लागली होती.

### वैभव सूर्यवंशीची तुफानी फटकेबाजी

**नवी दिल्ली ।** वैभव सूर्यवंशीला काही दिवसांपूर्वीच भारताचे कर्णधारपद देण्यात आले आणि त्यानंतर त्याची तुफानी फटकेबाजी पाहायला मिळाली. यावेळी वैभव सूर्यवंशीचा स्ट्राइक रेट ३१० धावा होता. त्यामुळे वादळी फटकेबाजी करत त्याने मैदान गाजवले. दोन दिवसांपूर्वी भारताचा वर्ल्ड कपसाठी संघ जाहीर झाला, त्यामध्ये वैभवला संधी देण्यात आली. पण सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे भारताचा १९ वर्षांखालील संघ आता दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर जाणार आहे.

# धुळ्यात भाजपाशी अंतर ठेवत शिंदे सेना अजित पवारांची राष्ट्रवादी लढणार एकत्र

प्रतिनिधी । धुळे

**येथील महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युतीसंदर्भात ठोस निर्णय होत नसल्याचे लक्षात येताच शिवसेना शिंदे गटाने भाजपाशी अंतर ठेऊन थेट मित्रपक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्याशी 'शेकहॅन्ड' केल्याची चर्चा शहरात आज अचानक सुरू झाली.**

राज्यात भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांची महायुती असताना दुसऱ्या बाजूने शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि काँग्रेस यांची महाविकास आघाडी कार्यरत आहे. त्यामुळे धुळे महापालिका निवडणुकीत हेच राजकीय गणित स्थानिक पातळीवर कायम राहणार की नाही, याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती. पण, महापालिका निवडणूक जाहीर होऊन प्रक्रिया अर्ध्यावर येऊन ठेपली असतानाही महायुती किंवा महाविकास आघाडीबाबत कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली.

दरम्यान, महाविकास आघाडीच्या कोअर कमिटीची बैठक पार पडली असून खासदार डॉ. शोभा बच्छाव, माजी आमदार अनिल गोटे, शुभांगी पाटील यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत शिवसेना (उबाठा), महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि काँग्रेस यांच्यात जागा वाटपाचे सूत्र ठरवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मात्र याबाबत महाविकास आघाडीकडून अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. युतीबाबत भाजप जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी शिवसेना शिंदे गटाशी युती होण्याचे संकेत दिले. प्राथमिक चर्चेत शिवसेनेने १७ जागांची मागणी (पान २ वर)

# मोदी आणि ईव्हीएमवर भाजपचा माज

## • त्यांचे स्वप्न गाडण्यासाठी एकत्र या, राज ठाकरे यांचे भावनिक आवाहन

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्र आणि मराठी माणसासाठी मुंबई अत्यंत महत्वाची असून तिला ताब्यात घेण्यासाठीच सारा खटाटोप सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ईव्हीएमवरच भाजपचा माज असून पालिका निवडणुकीत त्यांचे स्वप्न गाडण्यासाठी आणि मुंबईला वाचविण्यासाठी एकत्र या, असे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज केले.**



मुंबईसह राज्यातील महापालिकांच्या निवडणुका एकत्रित लढविण्याचा निर्णय शिवसेना(ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने घेतला असून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वीच दोन्ही पक्षांच्या युतीची घोषणा केली आहे. या युतीचे मुंबईकर आणि दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी स्वागत केले असतानाच, युतीमुळे उमेदवारी मिळण्याची शक्यता दुरापास्त झाल्याने दोन्ही पक्षातील नाराजांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. युतीचे जागावाटप पूर्ण झाले असून मनसेला कमी जागा मिळाल्याने नाराजांची संख्या मोठी आहे. पक्षातील वाढता असंतोष दूर करण्यासाठी आणि नेत्यांची समजूत काढण्यासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज सकाळी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला. या मेळाव्यास पक्षातील सर्व नेते, उपनेते, तसेच स्थानिक पातळीवरील गट आणि शाखा अध्यक्षांना आमंत्रित करण्यात आले होते.

**काय म्हणाले राज ठाकरे?**

मेळाव्याला उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना राज ठाकरे यांनी मुंबईसाठी आपण आपला राग, राजकीय मतभेद बाजूला ठेवले आहेत. मुंबईचा लचका तोडण्याचे काम सुरु असून त्यांचे हे स्पप्न धुळीस मिळविण्यासाठी सर्वांनी सावध राहिले पाजिते. भाजपला मुंबई ताब्यात घ्यायची असून मुंबईसह संपूर्ण महानगर प्रदेश गुजरातला जोडायचा आहे. एवढे दिवस आपण सत्ताविना राहिलो तरी आपला दबदबा कमी झालेला नाही. त्यामुळे या निवडणुकीत मुंबईला (पान २ वर)

मुंबई महापालिकेत प्रशासकाच्या- आयुक्तांच्या माध्यमातून सरकारची मनमर्जी सुरू आहे. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान या सर्व गोष्टींचा बंडाफोड करण्याचा इशाराही ठाकरे यांनी दिला. मुंबई आणि मराठी माणसाच्या हितापुढे राजकीय स्वार्थ शुल्लक असून कुणाच्या व्यक्तीगत स्वार्थाकडे पाहू नका. कुणाला किती जागा मिळाल्या याकडे न पाहता युतीचे उमेदवार आपलेच आहेत, असे समजून कामाला लागा, असे आवाहनही त्यांनी केले.

# शिरपूर तालुक्यात निंबाच्या झाडाला दोरीने गळफास घेत नवदाम्पत्याची आत्महत्या

प्रतिनिधी । शिरपूर

**• नवविवाहित जोडप्याच्या अचानक जाण्याने ग्रामस्थ हळहळ व्यक्त करत आहेत. घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले होते. तरुण वयात संसार सुरू होण्यापूर्वीच आयुष्य संपल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, पोलिसांकडून कोणताही निष्कर्ष काढण्यापूर्वी सर्व बाजूंनी तपास केला जात असून, आत्महत्येमागील नेमके कारण स्पष्ट होण्यासाठी अहवालाची प्रतीक्षा करण्यात येत आहे.**

तालुक्यातील सटीपाणी शिवारात एकाच निंबाच्या झाडाला दोरीने गळफास घेतलेल्या नवविवाहित जोडप्याचा मृतदेह आढळून आल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. या घटनेत पप्पु मांगिलाल पावरा (२३) आणि त्याची पत्नी लक्ष्मी पप्पु पावरा (१९, दोघेही रा. सटीपाणी, ता. शिरपूर, जि. धुळे) अशी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे आढळले. ही घटना अकस्मात मृत्यू म्हणून शिरपूर शहर पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे.

यासंदर्भात मांगीलाल दर्जी पावरा (४०, रा. सटीपाणी ता.शिरपूर) यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार रविवारी (दि. २८) सकाळी साडेसहा ते सात वाजेच्या सुमारास सटीपाणी शिवारातील शेतात गेलेल्या नातेवाइकांसमोरच आधी ही धक्कादायक घटना उघडकीस आली. शेतातील निंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने दोघांनी गळफास घेतल्याचे दृश्य पाहून नातेवाइकांनी तातडीने शिरपूर शहर पोलीस ठाण्यात माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

पोलीस व नातेवाइकांच्या मदतीने दोन्ही मृतदेह झाडावरून खाली उतरवून आपसिंग देवराव पावरा, राजू दर्जी पावरा आणि सुकलाल वाहऱ्या पावरा यांनी खाजगी वाहनाने शिरपूर येथील कुटीर रुग्णालयात नेले. दुपारी सव्वादोन वाजता दोघांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असता डॉ. राहुल लांबोळे यांनी पप्पु पावरा व लक्ष्मी पावरा या दोघांनाही मृत घोषित केले. याप्रकरणी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार प्राथमिक तपासात गळफास घेतल्याने मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. घटनास्थळी कोणताही पोलिसांना तूर्त तरी संशयास्पद प्रकार किंवा हत्यार आढळून आलेले नाही. या घटनेची पाहणी उपविभागीय (पान २ वर)

# छ. संभाजीनगरमध्ये अजित पवार गटाची 'एकला चलो रे'ची भूमिका

## १८ उमेदवारांची पहिली यादी केली जाहीर

वृत्तसंस्था । छत्रपती संभाजीनगर

महायुतीमधील जागावाटपाचा तिढा सुटत नसल्याचे पाहून राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) अखेर एकाला चलो रे चा नारा दिल्याचं दिसत आहे. आम्ही भाजप किंवा शिवसेनेच्या भरवशावर राहणार नाही, अशी आक्रमक भूमिका घेत शहराध्यक्ष अभिजीत देशमुख यांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाने १८ उमेदवारांची पहिली अधिकृत यादीही प्रसिद्ध केली असून, यामुळे महायुतीत उभी फूट पडल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच चर्चा सुरु झाली आहे. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जागावाटपाबाबत १८ डिसेंबर रोजी पहिली आणि शेवटची बैठक पार पडली होती.

# जातीय समीकरणांमुळे भाजपामध्ये फुटीची चिन्हे?

## • ४० ब्राम्हण आमदारांच्या बैठकीने वाद

वृत्तसंस्था । लखनौ

येथे भाजपातील ब्राह्मण आमदारांची एक बैठक पार पडली. ही बैठक वादाचा विषय ठरत आहे. त्यामुळे २०२७ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांतर्गत जातीवर आधारित गटबाजी रोखण्यासाठी भाजपा नेतृत्वाकडून आपल्या लोकप्रतिनिधींना जातीच्या आधारावर बैठका न घेण्याचा इशारा देण्यात आला आहे. जातीवर आधारित घेतलेल्या या बैठकीमध्ये तब्बल ४० आमदारांची उपस्थिती होती. यावर आता जोरदार टीका केली जात आहे. या बैठकीकडे भाजपातील अंतर्गत फुटीची चिन्ह म्हणूनदेखील पाहिले जात आहे. नेमके हे प्रकरण काय? आमदारांच्या बैठकीने वाद का निर्माण झालाय? भाजपाने आपल्याच नेत्यांना इशारा का दिला? जाणून घेऊयात.

भाजपाचे उत्तर प्रदेशचे प्रदेशाध्यक्ष पंकज चौधरी यांनी सार्वजनिकरीत्या हा इशारा दिला. लखनौमधील कुशीनगरचे आमदार पी. एन. पाठक यांच्या निवासस्थानी भाजपाच्या अनेक ब्राह्मण आमदार आणि विधान



परिषद सदस्यांची बैठक झाली होती. राज्यातील ब्राह्मण समाजावर अन्याय होत असल्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आली होती. चौधरी यांनी एका कठोर निवेदनात म्हटले आहे की, 'ही बैठक पक्षाची घटना आणि मूल्यांच्या विरोधात होती.' तसेच भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती झाल्यास ती शिस्तभंग मानली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

भाजपाच्या एका नेत्याने सांगितले की, केवळ ब्राह्मण समाजाच्या बैठकीमुळेच नेतृत्वाला ही भूमिका घ्यावी लागली असे नाही. 'मंगळवारी रात्री झालेल्या ब्राह्मण आमदारांच्या डिनर बैठकीपूर्वी, त्याच दिवशी दुपारी लखनौमधील एका हॉटेलमध्ये पश्चिम उत्तर प्रदेशमधील भाजपा आमदार आणि पदाधिकाऱ्यांची बैठक झाली होती. या बैठकीला उपस्थित असलेले नेते पश्चिम उत्तर प्रदेशमधील (पान २ वर)

# जळगावात महायुती : ५०-२५ फॉर्म्युल्यावर शिक्कामोर्तब

## • महायुती पूर्ण ताकदीने मैदानात : आमदार किशोर पाटील

प्रतिनिधी । जळगाव

जळगाव महानगरपालिकेची आगामी निवडणूक महायुती पूर्ण ताकदीने लढवणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांची युती भक्कम असून, येणाऱ्या निकालात महायुतीचाच झेंडा महापालिकेवर फडकणार, असा ठाम विश्वास आमदार किशोर पाटील यांनी व्यक्त केला. शहराच्या विकासासाठी जनता महायुतीच्या उमेदवारांना भरभरून मते देईल, असा दावा यावेळी करण्यात




आला.

महापालिकेच्या निवडणुकीसाठी युतीत जागावाटपाचा ५०-२५चा फॉर्म्युला ठरल्याची माहिती आ. किशोर पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली. तसेच महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसलाही सामावून घेतले जाणार असून, भाजपच्या ५० जागांपैकी काही जागा राष्ट्रवादीसाठी सोडण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे महायुती अधिक व्यापक व मजबूत होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. दरम्यान, आज उमेदवारी अर्ज भरण्याच्या दिवशी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीत सकाळी ११ वाजेपासूनच इच्छुक उमेदवार व कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. दुपारी २ वाजेपर्यंत विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी आपापल्या समर्थकांसह शक्तीप्रदर्शन करत अर्ज दाखल केले. जोरदार घोषणाबाजीमुळे महापालिका परिसराला जणू एखाद्या मोठ्या यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

• आमदार किशोर पाटील यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटातील अनेक माजी नगरसेवकांनी आज आपले उमेदवारी अर्ज भरले. यात महानगरप्रमुख संतोष पाटील, सागर श्यामकांत सोनवणे व पायल दारकुंडे यांनी प्रभाग क्रमांक २ मधून, नरेश राजपूत यांनी प्रभाग क्रमांक १० मधून, तर माजी महापौर तथा महानगरप्रमुख विष्णू भंगाळे यांनी प्रभाग क्रमांक ५ मधून उमेदवारी अर्ज दाखल केला. सर्व उमेदवारांनी समर्थकांसह पालिकेत प्रवेश करत विजयाचा आत्मविश्वास व्यक्त केला.

# माजी नगरसेवकांसह अनेक इच्छुकांनी भरला उमेदवारी अर्ज

## आ.किशोर पाटील यांच्या उपस्थितीमुळे राजकीय चर्चांना उधान





प्रतिनिधी । जळगाव

**महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सध्या सुरु आहे. या निवडणुकीसाठी शिवसेना शिंदे गटाकडून माजी महापौर विष्णू भांगाळे, भाजपच्या माजी महापौर सीमा भोळे यांच्यासह माजी नगरसेवकांसह नवख्या उमेदवारांनी अर्ज दाखल केले. त्यामुळे यंदाची निवडणूक चुरशीची होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. दरम्यान, पाचोऱ्यातील शिवसेना शिंदे गटाचे आमदार किशोर पाटील हे इच्छुकांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यास उपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधान आले आहे.**

सोमवार दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपासून महापालिकेच्या दुसऱ्या मजल्यावर असलेल्या निवडणूक विभागात उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शेवटचे दोन दिवस उरले असताना, जळगाव महानगरपालिका परिसरात राजकीय पदाधिकाऱ्यांसह समर्थकांची प्रचंड गर्दी दिसून आली. यावेळी राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी आपापल्या समर्थकांसह शक्तीप्रदर्शन करत अर्ज सादर केले. कार्यकर्त्यांच्या घोषणाबाजीमुळे महापालिका परिसर दणाणले होते. तसेच सतरा मजली परिसराला यात्रेचे स्वरुप आले होते.

**यांनी केली उमेदवारी दाखल ...**

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या आजच्या दिवशी माजी महापौर नितीन लढ्ढा, विष्णू भंगाळे, सीमा भोळे, संतोष पाटील, पायल दारकुंडे, उज्ज्वला बाविस्कर, मनोज चौधरी, डॉ. अमृता सोनवणे, गौरव सोनवणे, कांचन संकत, गणेश सोनवणे, स्वप्निल परदेशी, रंजना सपकाळे, ॲड. पियूष पाटील, जितेंद्र मराठे, सागर सोनवणे, गायत्री राणे, प्रतिक्षा सोनवणे, कल्पेश सोनवणे, कलाबाई शिरसाठ आदींनी अपला उमेदवारी अर्ज दाखल केला. दरम्यान, दि. ३० डिसेंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने झुंबड उडणार आहे.

### ■ आई-वडिलांच्या आशीर्वादाने राजकीय प्रवास प्रारंभ - डॉ. अमृता सोनवणे



चोपडा विधानसभा मतदारसंघातील शिवसेना (शिंदे गट) आ. चंद्रकांत सोनवणे, माजी आ. लताताई सोनवणे यांच्या आशीर्वादाने राजकीय प्रवासास सुरुवात करीत आहे. आमचे सर व हितचिंतकांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटाकडून प्रभाग ११ अ मधून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. जनसेवेसाठी आपली उमेदवारी आहे, अशी भुमिका डॉ. अमृता चंद्रकांत सोनवणे यांनी उमेदवारी दाखल केल्यानंतर दै. शौर्य मराठीशी बोलतांना मांडली. तसेच गौरव चंद्रकांत सोनवणे यांनी देखील प्रभाग १८ अ मधून शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी दाखल केली आहे. सागर शामकांत सोनवणे यांनी देखील उमेदवारी दाखल केली आहे. सोनवणे कुटुंबातील या उमेदवारांकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून आहे.

## श्री पार्श्व-भैरव भक्ती संध्याचे ४ रोजी आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

येथील श्री नाकोडा भैरव भक्ती मंडळातर्फे रविवार, दि.४ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता पांजरापोळ गोशाळा येथे श्री पार्श्व-भैरव भक्ती संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी राजस्थानातील नाथद्वारा येथील प्रसिद्ध गायक वैभव सोनी व टिम उपस्थित राहणार असून हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. सर्वानी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री नाकोडा भैरव भक्ती मंडळाकडून करण्यात आले आहे.

### तरुणास अटक; एमआयडीसी पोलिसांची कारवाई

## तांबापुरात सव्वा तीन किलो गांजा जप्त

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील तांबापूरा परिसरात गांजा बाळगणाऱ्या एका २३ वर्षीय युवकावर एमआयडीसी पोलिसांकडून कारवाई करण्यात आली. या कारवाईत त्याच्याकडून १९ हजार रुपये किमतीचा सव्वा तीन किलो गांजा जप्त करण्यात आला. त्याला ताब्यात घेऊन त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



तांबापूरा परिसरात एक इसम गांजा विक्री करण्याच्या उद्देशाने घरात गांजा बाळगत असल्याची गोपनीय माहिती एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांना मिळाली होती. त्यानंतर त्यांनी पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत धनके, सहाय्यक फौजदार विजयसिंग पाटील, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रमोद लाडवंजारी, पोलीस कॉन्स्टेबल गणेश ठाकरे, शशिकांत मराठे, राहुल घेटे आदींचे पथक तयार करुन कारवाईच्या सुचना केल्या. त्यानंतर पथकाने तांबापूरा गाठत मच्छिमार्केटच्या गल्लीतील एका घरात हातात गोणी घेऊन बसलेल्या इसमावर कारवाई केली. त्याची चौकशी केल्यानंतर त्याने त्याचे नाव शेख अशपाक शेख मेहमुद (वय-२३) असल्याचे व त्याच्या जवळील गोणीत गांजा असल्याचे सांगितले. त्यानंतर त्याला ताब्यात घेऊन त्याच्या ताब्यातील १९ हजार ३२० रुपये किमतीचा ३ किलो २२० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला.

## रोटरी इंटरनॅशनल असेंबलीसाठी डॉ.राजेश पाटील अमेरिकेला रवाना



प्रतिनिधी । जळगाव

अमेरिकेत ११ ते १६ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या रोटरी इंटरनॅशनल असेंबलीसाठी रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे गव्हर्नर इलेक्ट व जळगाव येथील बालरोग तज्ञ डॉ. राजेश पाटील व डॉ. सीमा पाटील हे रवाना झाले आहेत.

जगभरातील २२० देशांमधील ५२३ रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर या असेंबलीमध्ये सहभागी होणार आहेत. भारतातून ४२ रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर त्यात सहभागी होत असून डॉ.राजेश पाटील यांचा यात समावेश आहे.

रोटरीमध्ये डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पदाची निवडणूक तीन वर्ष आधी होत असते. नासिक ते गोंदिया अशा १३ जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे २०२६ - २७ मध्ये गव्हर्नर म्हणून डॉ. राजेश पाटील हे ११६ रोटरी क्लब मधील हजारो रोटरी सदस्यांचे नेतृत्व करणार आहेत. गव्हर्नर होण्याचा हा बहुमान जळगावला तब्बल १८ वर्षानंतर मिळाला आहे.

या इंटरनॅशनल असेंबली मध्ये जगभरातील रोटरी लीडर्ससमवेत डॉ. राजेश पाटील यांना विचारांचे आदान-प्रदान व सुसंवादाची संधी मिळणार आहे. मायादेवी नगरातील रोटरी भवन येथे झालेल्या कार्यक्रमात विविध रोटरी क्लबच्या अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्यांनी त्यांचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.

## पान १ वरुन

### शिंदेंचे अनेक शिलेदार......

वर्चस्व राहिलेले आहे. यावेळी मात्र काही प्रभागात भाजपाने उमेदवार देण्याची तयारी केल्याने शिंदेंच्या सेनेत प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. यावरूनच काही प्रभागात नाराजीनाट्य सुरू असून मध्यरात्रीच्या छुप्या बैठका पार पडत आहेत. नुकतीच राजन विचारे यांच्या कार्यालयात मध्यरात्री एक बैठक पार पडली. यावेळी त्यांना भेटण्यास भाजपासह शिंदे गटातील काही पदाधिकारी हजर असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

### मोदी आणि ईव्हीएमवर......

वाचविण्याठी आपण सर्वांनी नाराजी सोडून, आपपसातील मतभेद विसरुन निवडणुकीच्या कामाला लागावे असे आवाहन ठाकरे यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ईव्हीएमवर भाजपा निवडणुका जिंकण्याचा माज करीत असून अनेकांना त्यांच्याकडे गेलो तर तिकीट मिळेल अशी भाबडी आशा आहे.मात्र त्यांच्याच लोकांवर तिकीट न मिळण्याची टांगती तलवार आहे,याकडेही ठाकरे यांनी नेत्यांचे लक्ष वेधले.

### धुळ्यात भाजपाशी अंतर ठेवत......

केली होती; मात्र भाजपकडून पाच जागा देण्याची तयारी दर्शवण्यात आली आहे. यावर एकमत झाल्यानंतरच अधिकृत घोषणा होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तथापि या चर्चेतही ठोस निर्णय न झाल्याने संभ्रम कायम राहिला. युतीचा निर्णय लांबत गेल्याने अखेर शिवसेना शिंदे गटाने माघार घेत स्वबळावर निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, भाजपशी युती फिस्कटल्याने शिवसेना शिंदे गटाने राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे मैत्रीसाठी हात पुढे केल्याची माहिती सूत्रांनी दिली. यानंतर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे कोअर कमिटी सदस्य अनिल मुंदडा यांनी प्राथमिक चर्चा झाल्याचे मान्य केले असून, अंतिम निर्णयानंतरच अधिकृत घोषणा होईल, असे स्पष्ट केले आहे. धुळे शहरातील स्थानिक राजकीय समीकरणे पाहता महापालिकेतील सत्ता स्थापनेसाठी कोणताही पक्ष स्वबळावर बहुमत मिळवेल, अशी स्थिती सध्या तरी दिसत नाही. मागील निवडणुकीत भाजपसत्ताधारी पक्ष ठरला होता, तरी सभागृहात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि एमआयएम यांनाही प्रतिनिधित्व मिळाले होते. विशेषतः शहरातील काही प्रभागांमध्ये एमआयएमचा प्रभाव असून अल्पसंख्याक मतदार निर्णायक भूमिका बजावू शकतात. त्यामुळे युती अथवा आघाडीचे गणित अधिक महत्त्वाचे ठरत आहे. इच्छुक उमेदवारांची संख्या मोठी असल्याने पक्षांतर्गत नाराजी, बंडखोरी आणि अपक्ष उमेदवारीचेही चित्र उभे राहण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. याशिवाय विकासकामे, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, घरपट्टी आणि शहरातील वाढती लोकसंख्या ही प्रमुख स्थानिक मुद्दे निवडणुकीत केंद्रस्थानी राहणार आहेत. नागरिकांमध्ये महापालिकेच्या कार्यक्षमतेबाबत नाराजी असल्याने मतदारांचा कल कोणत्या पक्षाकडे झुकतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत धुळे शहराच्या राजकारणात मोठे घडामोडी घडण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

### शिरपूर तालुक्यात निंबाच्या......

पोलीस अधिकारी सुनिल गोसावी, पोलीस निरीक्षक जयपाल हिरे, पोलीस निरीक्षक दरवडे, पोलीस निरीक्षक कुशारे यांनी केली. सकाळी १० ते दुपारी एक या वेळेत घटनास्थळी पंचनामा व तपासाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. दरम्यान, तरुण वयातील नवविवाहित जोडप्याने एकाच वेळी टोकाचे पाऊल का उचलले, याबाबत गावात विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. कौटुंबिक अडचण, आर्थिक समस्या की अन्य काही कारण होते, याचा शोध घेण्यासाठी पोलीस तपास सुरू आहे. मृतांच्या नातेवाइकांचे जबाब नोंदवले जात असून, मोबाईल व इतर बाबींचीही तपासणी केली जात आहे. या दुर्दैवी घटनेमुळे सटीपाणी गावावर शोककळा पसरली आहे.

### जातीय समीकरणांमुळे......

एका ज्येष्ठ जाट नेत्याचे विरोधक मानले जातात. त्या बैठकीचे फोटो बाहेर न आल्यामुळे ती फारशी चर्चेत आली नाही,' असे एका नेत्याने सांगितले. भाजपाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पूर्व उत्तर प्रदेशमधील काही ब्राह्मण आमदारांनी 'शक्ती प्रदर्शना'साठी बैठक बोलावली होती. ही बैठक 'बाटी-चोखा' भोजनाच्या निमित्ताने आयोजित केली होती. या बैठकीत भूमिहार आणि कुर्मी समाजातील काही भाजपा आमदारही उपस्थित होते असे समोर आले आहे. 'या बैठकीत सहभागी झालेल्या आमदार आणि विधान परिषद सदस्यांची नावे आणि संपर्क तपशील असलेली दोन पाने सोशल मीडियावर व्हायरल झाली. ब्राह्मण लोकप्रतिनिधींचा व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यासाठी ही माहिती गोळा करण्यात आली होती,' अशी माहिती भाजपामधील एका सूत्राने दिली. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपाचे केंद्रीय नेतृत्व या बैठकीवर नाराज असून मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या कार्यालयानेही याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

## डॉ.नरेंद्र साळुंखे यांना पीएच.डी. प्रदान

प्रतिनिधी । जळगाव



**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठचा ३४ वा दीक्षांत समारंभ नुकताच पार पडला. या समारंभात मायक्रोबायोलॉजी या विषयात डॉ.नरेंद्र सुभाष साळुंखे यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. कुलगुरू, प्र-कुलगुरू, अधिष्ठाता, परीक्षा नियंत्रक तसेच अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली.**

कुलगुरू प्रा.व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांच्याहस्ते व परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सर्वश्री राजेंद्र नन्नवरे, प्रा.अनिल डोंगरे, प्रा.साहेबराव भूकन, प्राचार्य जगदीश पाटील, प्राचार्य एस.आर. राजपूत व मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. डॉ.साळुंखे यांनी हे संशोधन प्रा.सतीश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. त्यांच्या संशोधन कार्याला मायक्रोबायोलॉजी क्षेत्रात अभ्यासपूर्ण व महत्त्वपूर्ण योगदान म्हणून विशेष मान्यता मिळत आहे. संशोधनादरम्यान त्यांनी विषयाचा सखोल अभ्यास करून वैज्ञानिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण निष्कर्ष मांडले आहेत. डॉ.नरेंद्र सुभाष साळुंखे हे सुभाष श्रीराम साळुंखे यांचे चिरंजीव आहेत. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## मातोश्री प्राथमिक विद्यालयात रंगल्या 'गंमत गोष्टी'

### ● कागदापासून जहाज, फुलपाखरु बनवत घेतला उपक्रमाचा आनंद

प्रतिनिधी । जळगाव

**येथील मातोश्री प्राथमिक विद्यालयात 'गंमत गोष्टी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभागी होत क्लासरूम सजवणे, उद्यान तयार करणे, ध्यान, कागदापासून जहाज, फुलपाखरु बनवत उपक्रमाचा आनंद घेतला.**



उपक्रमात आपण फाउंडेशनच्या अध्यक्षा देवयानी गोविंदवार यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला चालना देणाऱ्या विविध कृती सादर केल्या. विद्यार्थ्यांनी देखील गट तयार करून क्लासरूम सजवणे, उद्यान तयार करण या उपक्रमांत सहभाग घेतला. त्यानंतर ध्यान सत्र घेण्यात आले.

या सत्रातून विद्यार्थ्यांना मनावर ताबा कसा ठेवावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर रसिका वाल्लेकर यांनी पद्मभूषण पं. कुमार गंधर्व यांची गोष्ट व जीवनपरिचय करून दिला. त्यानंतर जीशांत मुलाणी यांनी विद्यार्थ्यांना कागदाच्या साहाय्याने जहाज पाखरू बनवण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपक्रम समन्वयक समाधान इंगळे, कविता गावित, मिलिंद नाईक, आर्यन शशीधरण आदींचे सहकार्य लाभले. 'गंमत गोष्टी' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक, भावनिक व सर्जनशील विकासाला मोठी चालना मिळाल्याचे मनोगत मान्यवरांनी व्यक्त केले. प्रबोधन संस्थेचे अध्यक्ष माजी आ.ॲड. जयप्रकाश बाविस्कर, आपण फाउंडेशनचे अध्यक्ष मनोज गोविंदवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.

# तणावमुक्तीसाठी प्राणायाम हे एक प्रभावी साधन

### ● डॉ.मनीषा इंदाणी यांचे प्रतिपादन; प्राणायाम कार्यशाळेचा समारोप

प्रतिनिधी । जळगाव

**आजच्या धावपळीच्या युगात तणावमुक्तीसाठी प्राणायाम हे एक प्रभावी साधन आहे. केवळ १५ दिवस नव्हे, तर आयुष्यभर प्राणायामाचा सराव केल्यास शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राहते, असे प्रतिपादन आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेच्या संचालिका डॉ.मनीषा इंदाणी यांनी केले.**



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागातर्फे आयोजित १५ दिवसीय प्राणायाम कार्यशाळेचा रविवारी (दि.२८) समारोप झाला. या समारोपीय कार्यक्रमाला त्या ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होत्या. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. इंजि. राजेश पाटील यांनी देखील यावेळी मनोगत व्यक्त केले. प्राणायाम हा शरीर आणि मन शुद्ध करणारा एक शक्तिशाली अभ्यास आहे. परंतु, त्याचा योग्य प्रकारे सराव करणे आवश्यक आहे. आताच्या आधुनिक धावपळीच्या युगात योग आणि प्राणायामाचे महत्व खूपच जास्त वाढलेले आपल्याला दिसून येत आहे, असे ते यावेळी म्हणाले. त्यानंतर वैशाली शर्मा, नीलिमा लढे, डॉ.लीना चौधरी यांनी देखील मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा.गीतांजली भंगाळे यांनी केले तर आभार प्रा.लिंता चौधरी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माधवी तायडे, तुषार सोनवणे, रत्नाकर सोनार, ललित शिंदे आदींचे सहकार्य लाभले.

**प्राणायमच्या विविध प्रकाराचे दिले प्रशिक्षण**

विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, परिसरातील निवासी कर्मचारी, कुटुंब व वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थीनी आणि अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी दि.१४ ते २८ डिसेंबर दरम्यान या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत संथ श्वसन, दीर्घ श्वसन, जलद श्वसन तसेच प्राणायामाचे विविध प्रकार यांचे प्रशिक्षण दिले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# कापूस खरेदी केंद्राला पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली भेट

## शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी तात्काळ सोडवण्याच्या दिल्या सूचना

प्रतिनिधी । दोंडाईचा

**येथील अभिषेक जिनिंग अँण्ड प्रोसेसिंग या भारतीय कापूस निगमच्या खरेदी केंद्राला राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी अचानक भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करुन समस्या जाणून घेतल्या तर शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी तात्काळ सोडवण्याच्या दिल्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.**



कापूस खरेदी केंद्राला भेट दिल्यानंतर ना.रावल यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला व खरेदी प्रक्रियेत असलेल्या अडचणी जाणून घेतल्या.

या वेळी मंत्री रावल यांनी कापूस नोंदणी, स्लॉट बुकिंग व प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया यांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी शेतकऱ्यांनी स्लॉट बुकिंगमध्ये मोठ्या प्रमाणावर अडचणी येत असल्याचे सांगितले. त्यानंतर ना.रावल यांनी अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्कसाधून शेतकऱ्यांना येत असलेल्या अडचणी तात्काळ सोडवण्याच्या, राज्यातील शेतकऱ्यांचा हमीभाव योजनेत कापूस विक्रीचा कल पाहता आवश्यक त्या ठिकाणी जिनिंगच्या खरेदी क्षमतेत वाढ करण्याच्या, शेतकऱ्यांना स्लॉट बुकिंग करतांना तसेच कापूस विक्री करताना कुठल्याही प्रकारची तांत्रिक अडचण येणार नाही या साठी आवश्यकते नियोजन करण्याच्या तसेच कापूस खरेदी प्रक्रिया जलदगतीने करावी, खरेदी केंद्राच्या क्षमतेत वाढ करण्यात यावी, अशा सुचना दिल्या.

**■ खरेदी क्षमता वाढवा...**

नोंदणी, स्लॉट बुकिंग व कापूस खरेदी प्रक्रियेत कोणतीही तांत्रिक अडचण येऊ नये, यासाठी यंत्रणा अधिक सक्षम करण्यात यावी, ज्या जिनिंगची खरेदी क्षमता कमी आहे, त्या जिनिंगची क्षमता वाढवण्याचे निर्देशही ना.रावल यांनी यावेळी दिले.

**कापूस किमान हमीभाव योजनेत विकला गेला पाहिजे...**

शेतकऱ्यांनी पिकवलेला कापूस शासनाच्या किमान हमीभाव योजनेत वेळेत विकला गेला पाहिजे, ही शासनाची भूमिका आहे. शेतकऱ्यांनी साठवलेला कापूस विक्री करताना कुठली अडचण येणार यासाठी यंत्रणेने आवश्यक ती काळजी घेऊन नियोजन करावे. तसेच कापूस खरेदी प्रक्रिया अधिक पारदर्शक व जलद करण्यात यावी.

**– जयकुमार रावल,**
पणन मंत्री, महाराष्ट्र राज्य.

# नागझरी सरी येथे अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन



प्रतिनिधी । नवापूर

**तालुक्यातील गृप ग्रामपंचायत नागझरी सरी येथे नवीन अंगणवाडी इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे ज्येष्ठ नेते भरत गावीत व नवापूर नगरपालिकेचे गटनेते नरेंद्र नगराळे यांच्याहस्ते करण्यात आले.**

याप्रसंगी माजी सरपंच विक्रम गावीत, उपसरपंच रामदास गावीत, आयुब गावीत, नवीन गावीत, कणीत गावीत यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, गावकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

अंगणवाडी इमारतीच्या उभारणीमुळे ग्रामीण भागातील बालकांसाठी सुरक्षित व सोयीस्कर शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

## थोडक्यात

### डॉ.ऐश्वर्या जैन यांना प्रथम पुरस्कार



**शिरपूर ।** तालुक्यातील तरडी येथील श्री विलेपार्ले केळवणी मंडळ कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राध्यापिका व संशोधक डॉ. ऐश्वर्या जैन यांनी फार्मसी संशोधन क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी करत राष्ट्रीयस्तरावर प्रथम पुरस्कार पटकावला. बेंगळुरु येथे पार पडलेल्या ७४ व्या इंडियन फार्मास्युटिकल काँग्रेस (आयपीसी-२०२५) दरम्यान झालेल्या पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### हरिसिध्दी गिरासेला कुराश स्पर्धेत सुवर्णपदक

**धुळे ।** येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय ज्युनिअर कुराश स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. तिने केलेल्या या चमकदार कामगिरीच्या जोरावर तिची जानेवारी २०२६ मध्ये पाटणा बिहार येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला प्राचार्य डॉ.हितेंद्र पाटील, क्रीडा संचालक प्रा.मनोज चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे, विलास देवरे आदींनी कौतूक केले आहे.

# मतदानासाठी वेळ काढा, जबाबदारी आपली पार पाडा

## ● धुळे शहरात काढण्यात आली मतदान जनजागृती रॅली; शाळकरी विद्यार्थ्यांचा सहभाग



प्रतिनिधी । धुळे

**महानगरपालिका निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, लोकशाही अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने धुळे शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीत विद्यार्थ्यांनी 'मतदानासाठी वेळ काढा, जबाबदारी आपली पार पाडा' अशा घोषणा देत नागरिकांना निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन केले.**

दिव्यांग मतदारांच्या सहभागाबाबतही या रॅलीतून विशेष जनजागृती करण्यात आली. समाजाने देता मदतीचा हात, दिव्यांग सुद्धा देतील मतदानाला साथ, प्रत्येकाला आहे समान अधिकार, दिव्यांगांसह जागृत व्हा सर्व मतदार या घोषवाक्यांद्वारे सर्वसमावेशक संदेश देण्यात आला.

शहरातील महाराणा प्रताप प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, उन्नती प्राथमिक व माध्यमिक स्कूल तसेच धुळे महापालिकेच्या सर्व शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी सहभागी झाले होते. जयहिंद कॉलनी, मौलवीगंज, साक्रीरोड, बारापत्थर, नकानेरोड, विष्णूनगर, चंदननगर, जयहिंद कॉलनीसह विविध भागांतून ही रॅली काढण्यात आली.

रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी धुळेकर, मतदान कर- लोकशाहीला मजबूत कर, आम्हनं-तुम्हनं करू नका, मतदान करणं चुकवू नका, मनात असू द्या एकच ध्यास, मतदान करून करू या धुळ्याचा विकास, जनाची मनाची पुकार आहे, मतदान आमचा अधिकार आहे, आद्य कर्तव्य भारतीयांचे पवित्र कार्य- मतदानाचे, लोकशाही आमची देशाची शान, मतदान करून वाढवा संविधानाचा मान अशा घोषणांतून लोकशाही मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.



**नंदुरबार ।** नगरपालिकेत स्थानिक आमदार निधीतून दिव्यांग बांधवांना ई-सायकलचे वाटप करण्यात आले. आ.चंद्रकांत रघुवंशी यांच्याहस्ते या ई-सायकलचे वितरण करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा रत्ना रघुवंशी यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# गणित दिनानिमित्त पार पडले फलक प्रदर्शन

प्रतिनिधी । शिरपूर

राष्ट्रीय गणित दिनानिमित्त आर.सी. पटेल कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या गणित विभागातर्फे फलक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रदर्शनचे उद्घाटन प्राचार्य डॉ.एच.एस. महाजन यांच्याहस्ते करणण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ.ए.एम. पाटील, डॉ.आर.पी. महाजन, डॉ.जे.पी. महाशब्दे, डॉ.संदीप पाटील, प्रा.एस.डी. मोने, प्रा.आनंद माहेश्वरी, कार्यालयीन अधीक्षक संजय मोरे आदी उपस्थित होते. प्रदर्शनात गणित पदव्युत्तर विभागात वैष्णवी पाटील व मीनाक्षी वसावेने प्रथम, वंशीता भावसारने द्वितीय तर अश्विनी ब्राह्मणेने तृतीय क्रमांक पटकावला. तृतीय वर्ष गणित विषयात जांबिलसा जेनिफर, यशश्री मराठे, प्रार्थना अहिरे व झुलाह बारीराने प्रथम, यशश्री साळुंखेने द्वितीय तर योगेश्री सूर्यवंशीने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

# प्रशिक्षण वर्गाला अनुपस्थित २६० मतदान अधिकारी, कर्मचाऱ्यांना बजावणार नोटीस

प्रतिनिधी । धुळे

**सार्वत्रिक महापालिका निवडणुकीसाठी मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रथम प्रशिक्षण वर्ग शहरातील छत्रपती शाहु महाराज नाट्यगृह येथे पार पडला.**



या प्रशिक्षण वर्गाला तब्बल २६० मतदान अधिकारी व कर्मचारी अनुपस्थित होते. या अनुपस्थिती अधिकारी, कर्मचाऱ्यांना राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे नोटीस बजावण्यात येणार असून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी नितीन कापडणीस यांनी प्रशिक्षण वर्गात मार्गदर्शन करुन निवडणुकीची जबाबदारी ही अतिशय महत्वपुर्ण असून ही जबाबदारी हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. हे कर्तव्य पार पाडावे व ही निवडणूक प्रक्रिया आत्मविश्वास पुर्वक व सर्वांच्या समन्वयाने यशस्वी करावी, असे आवाहन त्यांनी केले. दोन सत्रात हे प्रशिक्षण पार पडले. महापालिकेमार्फत एकुण १३ पथक व स्टॉल नियुक्त करण्यात आलेले होते. या ठिकाणी उपस्थितीची नोंद करुन कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिकेसाठी अर्ज नमुना वितरीत करण्यात आला. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या माहितीसाठी क्युआर कोड प्रदर्शीत करण्यात आलेले होते. यात मतदार यंत्र वापर पुस्तीका, मतदार यादी, मतदान केंद्राध्यक्ष माहिती पुस्तीका, निवडणूक निर्णय अधिकारी माहिती पुस्तीका व महत्वाचे संपर्क क्रमांक याबाबत माहिती क्युआर कोडव्दारे अधिकारी व कर्मचारी यांनी प्राप्त केली.

# धडगाव तालुक्यातील तलाई आश्रमशाळेतील अल्पवयीन विद्यार्थिनीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणाने जिल्हा हादरला

## ● आरोपीला तत्काळ अटक करण्यासाठी युवा क्रांतीचे जिल्हाभर आंदोलन

प्रतिनिधी । अक्कलकुवा

**धडगाव तालुक्यातील तलाई येथील शासकीय आश्रमशाळेत शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणामुळे संपूर्ण नंदुरबार जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षण व संरक्षणासाठी उभारलेल्या शासकीय आश्रमशाळेतच असा प्रकार घडणे ही अत्यंत गंभीर बाब असून, समाजाच्या नैतिकतेला काळीमा फासणारी घटना असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.**



आरोपी हा जबाबदारीच्या व विश्वासाच्या पदावर कार्यरत असून त्याने अल्पवयीन विद्यार्थिनीवर वारंवार बळजबरीने लैंगिक अत्याचार केले, तसेच जीवे मारण्याच्या धमक्या देऊन दीर्घकाळ तिला मानसिक गुलामगिरीत ठेवले. भीती, लाज व मानसिक दबावामुळे पीडितेने हा प्रकार बराच काळ कोणालाही सांगितला नाही. मात्र त्रास असह्य झाल्यानंतर अखेर कुटुंबीयांना माहिती दिल्यानंतर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. सदर गुन्हा पोक्सो कायद्यांतर्गत अत्यंत गंभीर स्वरूपाचा गुन्हा असून आरोपी मोकळा राहिल्यास पुरावे नष्ट होणे, साक्षीदारांवर दबाव टाकणे व पीडितेला पुन्हा त्रास देण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर युवा क्रांती नंदुरबारच्या वतीने जिल्हाभर तीव्र आंदोलनात्मक भूमिका घेत प्रत्येक तालुक्यात पोलीस प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले. आरोपीला तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अशी स्पष्ट व ठाम मागणी या निवेदनांमधून करण्यात आली.

धडगाव येथे तालुकाध्यक्ष लक्ष्मण पाडवी यांच्या नेतृत्वाखाली धडगाव पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले. तर शहादा येथे जिल्हा उपप्रमुख इंजि. गणेश पवार तसेच तालुकाध्यक्ष मनोज वसावे यांच्या नेतृत्वाखाली शहादा पोलीस निरीक्षकांना निवेदन सादर करण्यात आले. यासह जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही पोलीस अधिकाऱ्यांना निवेदने देऊन आरोपीविरोधात तातडीने कठोर पावले उचलण्याची मागणी करण्यात आली.

या संपूर्ण उपक्रमाचे आयोजन प्रदेश अध्यक्ष युवक क्रांती नंदुरबार ॲड. रुपसिंग वसावे, प्रदेश प्रवक्ते ॲड.संग्राम पाडवी, इंजि. राकेश पाडवी यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच इंजि. संदीप वळवी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, हा प्रश्न केवळ एका पीडित विद्यार्थिनीपुरता मर्यादित नसून, संपूर्ण आश्रमशाळा व्यवस्थेतील मुलींच्या सुरक्षिततेशी निगडित आहे.

युवा क्रांतीच्या वतीने जिल्ह्यातील सर्व वकील संघटनांनाही भावनिक व नैतिक आवाहन करण्यात आले असून, धडगाव तालुक्यातील तलाई आश्रमशाळेतील या अमानवी गुन्ह्यातील आरोपीची बाजू कोणत्याही वकीलाने घेऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांत आरोपीला सामाजिक व नैतिक संरक्षण मिळणे हे भविष्यातील गुन्ह्यांना खतपाणी घालणारे ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी इशारा दिला की, जर आरोपीला तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात आली नाही, तर युवा क्रांती नंदुरबारच्या वतीने जिल्हास्तरावर अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल. प्रशासनाने या प्रकरणाची अत्यंत संवेदनशीलतेने दखल घेऊन पीडितेला न्याय देण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

# बेटावद उजळले; दोन सोलर हायमास्ट लाईट कार्यान्वित

प्रतिनिधी । बेटावद

मुख्यमंत्री समृद्धी अभियानांतर्गत आमदार निधी व अपारंपरिक ऊर्जा निधीमधून बेटावद गावासाठी दोन सोलर हायमास्ट लाईट मंजूर करण्यात आले होते. दरम्यान, हे दोन्ही लाईट कार्यान्वित करण्यात आले असून यामुळे बसस्थानक चौकसह इंदिरानगर प्लॉट वस्ती परिसर उजळून निघाला आहे.

मुख्यमंत्री समृद्धी अभियानांतर्गत बेटावद गावामध्ये सध्या विकासाचे वारे वाहत असून, या अभियानातून गावाची प्रगती साधण्यासाठी अनेक विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. केवळ पथदीवेच नव्हे, तर ग्रामस्थांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी रस्ते, सांडपाणी व्यवस्था आणि इतर सार्वजनिक सुविधांच्या सक्षमीकरणावरही भर दिला जात आहे. बेटावद ग्रामपंचायतच्या पुढाकाराने व नियोजनबद्ध अंमलबजावणीमुळे हा सोलर प्रकल्प अल्प कालावधीत पूर्ण करण्यात आला. ग्रामपंचायतीचे सरपंच मंगलचंद जैन व ग्रामपंचायत सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ग्रामसेवक प्रमोद खलाणे यांच्या सहकार्याने सोलर हायमास्ट लाईटची उभारणी व कार्यान्वित करण्यात आले.

# मनियार समाजातर्फे ६० गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



प्रतिनिधी । शहादा

तळोदा व शहादा येथील मनियार समाजातर्फे समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कुकावल (ता. शहादा) येथे पार पडलेल्या या गुणगौरव समारंभात ६० गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जाकिर हाजी हनीफ मनियार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस निरीक्षक निलेश देसले, नासीर सत्तार मानियार, डॉ. शेख सलीम, अशपाक खान मनियार, आरिफ खान मनियार, शेख जमाल, निज़ाम नज़र मंसूरी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात ६० गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जाकिर हाजी हनीफ मनियार, नासिर सत्तार मनियार, हमीद मनियार, मुबीन मनियार, रहीम मनियार, अजीज मनियार, कलीम मनियार, रफीक भिकन मनियार, रफीक भैय्या, रफीक मजीद मनियार, तौसीफ मनियार, नासिर इस्माईल मनियार, अमजद पठान, रहीम मनवर मनियार, इसहाक मनियार, अंसार मनियार, बबलू मनियार, मोइन मनियार, रउफ मनियार, खलील मनियार, अल्लाह रखा मनियार, इरफान मनियार, जहीर मनियार आदींनी परिश्रम घेतले.

## फैजपूर नगरीत भक्ती महोत्सवाची जय्यत तयारी

### श्रीरामायण कथेसाठी भव्य मंडप उभारणी सुरू

**प्रतिनिधी । फैजपूर**

येथे दि. ४ ते ११ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या सामूहिक तुळसी अर्चन, विठ्ठल नामजप व नाम संकीर्तन महोत्सवाच्या तयारीला वेग आला आहे. या भक्तीम होत्सवासाठी खंडोबा देवस्थानच्या पाठीमागील पवित्र भूमीवर भव्य मंडप उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

या महोत्सवांतर्गत दररोज सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायक व नामधारक ह.भ.प. पंढरीनाथ महाराज आरू यांच्या अमृतमयी स्वरात सामूहिक श्री विठ्ठल नाम जप होणार आहे. या नाम जपात वै. ह.भ.प. नथसिंगबाबा दौरा मंडळ, परिसरातील संत मंडळी, कीर्तनकार, टाळकरी, महिला भजनी मंडळ व असंख्य भाविक सामूहिक सहभाग नोंदवणार आहेत.

या भव्य कार्यक्रमासाठी सुमारे सहा एकर क्षेत्रावर विशाल मंडप उभारण्यात येत आहे. हे कार्य श्रीमद् भागवत कथा व ज्ञानयज्ञ समिती, फैजपूर, यावल, रावेर तालुक्यातील



वारकरी भाविक भक्त व फैजपूर ग्रामस्थ मंडळी यांच्या संयुक्त प्रयत्नातून सुरू आहे. दररोज रात्री महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची नामसंकीर्तने आयोजित करण्यात आली आहेत. या महोत्सवात वै. नथूसिंगबाबा दौरा मंडळ तसेच सद्गुरु जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, आळंदी येथील प्रशिक्षित कीर्तनकार, गुणिजन, गायक व वादकांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. हा भव्य मंडप उभारण्यासाठी श्रीमद् भागवत कथा ज्ञान समितीचे अध्यक्ष निळकंठ सराफ, सचिव

**मानवी जीवनात नामजपाचे अनन्यसाधारण महत्त्व असून, या महोत्सवाच्या माध्यमातून भक्ती, संस्कार आणि आध्यात्मिक जागृतीचा संदेश दिला जाणार आहे. महोत्सव काळात दररोज दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत श्रीक्षेत्र नैमिषारण्य येथील महर्षी व्यास गादीपती प.पू. शैलेंद्रजी शास्त्री यांच्या अमृतमय वाणीतून श्रीरामायण कथा होणार आहे.**

ह.भ.प.नरेंद्र नारखेडे, चंद्रशेखर चौधरी, काशिनाथ वारके, लक्ष्मण पाचपांडे, सी. के. चौधरी, गणेश पाटील, गोपाळ चौधरी, नरेंद चौधरी, आर.पी. चौधरी, किशोर कोल्हे, डॉ. प्रभाकर बारी, सुरेश परदेशी, डिगंबर बऱ्हाटे, आर.एल. चौधरी यांच्यासह असंख्य सेवाभावी हात कार्यरत आहेत.

मंडप उभारणीचे काम चौधरी टेन्ट डेकोरेशन, साऊंड अँड लाईट, फैजपूरचे संचालक चेतन चौधरी व तेजपाल चौधरी मोठ्या तत्परतेने, नियोजनबद्ध पद्धतीने व आत्मियतेने पार पाडत आहेत. संपूर्ण परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी सर्व स्तरातून सहकार्य लाभत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## थोडक्यात

### अंजनविहिरे शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात

**भडगाव ।** कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील किसान शिक्षण संस्था, भडगाव संचलित माध्यमिक विद्यालय अंजनविहीरे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली शैक्षणिक सहल अत्यंत उत्साहात पार पडली. या सहलीत विद्यार्थ्यांना ऐतिहासिक, भौगोलिक व धार्मिक स्थळांची प्रत्यक्ष माहिती घेण्याची संधी मिळाली. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी परिसरातील प्रसिद्ध ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन त्या ठिकाणांचे ऐतिहासिक महत्त्व जाणून घेतले. तसेच भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांची पाहणी करताना निसर्गरचना, भूभागाची वैशिष्ट्ये याविषयी मार्गदर्शक शिक्षकांनी सविस्तर माहिती दिली. धार्मिक स्थळांच्या भेटीतून विद्यार्थ्यांना सांस्कृतिक वारसा, परंपरा व सामाजिक ऐक्याचे महत्व समजावून सांगण्यात आले.

### अहिरवाडीत समाज मंदिराच्या जागेचा वाद विकोपाला

**रावेर ।** तालुक्यातील अहिरवाडीत समाज मंदिरासाठी नियोजित असलेल्या जागेवर खड्डे का खोदता? असा जाब विचारल्याच्या रागातून एका तरुणावर लोखंडी अँगलने जीवघेणा हल्ला केल्याची खळबळजनक घटना घडली. या प्रकरणी रावेर पोलिसात चौघांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अहिरवाडी येथील फिर्यादी राहुल ताराचंद लहासे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार नितीन पुंडलिक वाघ, मंदा विजय वाघ, पंकज पुंडलिक वाघ आणि लाडकाबाई पुंडलिक वाघ यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भटक्या कुत्र्यांचा सहा जणांना चावा

**पाचोरा ।** शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे. या कुत्र्यांपासून वृध्द, महिला, शाळकरी मुले, मुली यांच्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कारण या कुत्र्यांनी तब्बल सहा जणांना चावा घेतला आहे. शहरात मांस विक्रीच्या ठिकाणी कुत्र्यांचा जास्त वावर असल्याने मांस विक्री उघड्यावर करणाऱ्यांवर बंदीची मागणी होत आहे.

## छाया पाटील यांनी स्वीकारला यावल नगराध्यक्षपदाचा पदभार

**प्रतिनिधी । यावल**

**येथील नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उमेदवार म्हणून विजय मिळवल्यानंतर आज सौ. छाया पाटील यांनी अधिकृतपणे नगराध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली.**

सोमवारी पार पडलेल्या या शपथग्रहण सोहळ्यामुळे यावलच्या राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याचे चित्र दिसून आले.शेकडो समर्थक, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या उपस्थितीत छाया पाटील यांनी नगराध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. निवडणूक निकालानंतर प्रथमच शहरात मोठ्या प्रमाणावर उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. विजयाचा आनंद साजरा करताना समर्थकांनी घोषणाबाजी करत नव्या नेतृत्वाकडून विकासाची अपेक्षा व्यक्त केली. या प्रसंगी माजी आ. रमेश चौधरी, माजी आ. शिरीष चौधरी, शिवसेनेचे उपनेते व संपर्क प्रमुख संजय सावंत, भुसावळचे अनिल चौधरी, यावलचे माजी नगराध्यक्ष अतुल पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे निवडून आलेले नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. छाया पाटील यांचे अभिनंदन करून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### कासोद्याचे नवे स.पो.नि. श्रीकांत पाटील

**प्रतिनिधी । कासोदा, ता. एरंडोल**

येथील पोलीस ठाण्यातील सपोनि निलेश राजपूत यांची जळगाव मुख्यालयी बदली झाली असून त्यांचे जागी श्रीकांत अंकूश पाटील यांची नेमणूक झाली आहे. त्यांनी आज कार्यभार स्वीकारला. श्रीकांत पाटील हे २०१२च्या पीएसआय बॅचचे अधिकारी असून त्यांनी या आधी पुणे येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून सेवा बजावली आहे.

## सार्वे बाभळे येथील माध्यमिक विद्यालयात मुक्तहस्त चित्रकला उपक्रम उत्साहात

**प्रतिनिधी । पारोळा**

**ज्ञानदीप बहुउद्देशीय विद्या प्रसारक मंडळ तामसवाडी संचलित माध्यमिक विद्यालय सार्वे बाभळे शाळेत ज्ञानदीप संस्थेचे अध्यक्ष भैय्यासाहेब पवार यांचं संकल्पनेतून शाळेत आनंददायी शनिवारच्या निमित्ताने पाने व फुले वापरून मुक्तहस्त चित्रकला हा अभिनव व सर्जनशील उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला.**



या उपक्रमात शाळेतील विविध इयत्तांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कल्पकतेचे उत्कृष्ट दर्शन घडविले. या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना परिसरातील झाडांची विविध पाने, रंगीबेरंगी फुले, काड्या तसेच इतर नैसर्गिक घटक वापरण्याचे आवाहन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मुक्तहस्त पद्धतीने निसर्गदृश्ये, फुलांची रचना, प्राणी-पक्षी, पर्यावरण विषयक चित्रे साकारली. प्रत्येक चित्रातून विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, सौंदर्यदृष्टी व निसर्गाविषयीचे प्रेम स्पष्टपणे दिसून आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता विकसित करणे, निसर्गाशी नाते जोडणे, तसेच पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देणे हा होता. पुस्तकी शिक्षणासोबतच अनुभवातून शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. विद्यार्थ्यांनी आनंदाने व उत्साहाने सहभाग घेत उपक्रम यशस्वी केला. हा उपक्रम शाळेचे उपशिक्षिका श्रीमती मोनाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्याधापक दीपक मुरलीधर पाटील तसेच शिक्षक रंगराव साळुंखे, सचिन पाटील, बाळासाहेब निकुंभ, कविता सोनवणे, हरीश पाटील, दीपक श्रीराम पाटील, गोपाल पाटील, निलेश पाटील, उमाकांत बाविस्कर, सुनील पाटील यांच्या सहकार्याने पार पडला.

## यावल येथून निघालेल्या साईबाबा पालखी पदयात्रेचे किनगाव येथे स्वागत

**प्रतिनिधी । यावल**

### साई पालखीचे ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात करण्यात आले स्वागत

**तालुक्यातील चिंचोली येथील श्रीक्षेत्र साईबाबा मंदिर धोबीवाडा यावल ते श्रीक्षेत्र साईबाबा मंदिर शिर्डी येथे सालाबादप्रमाणे पालखी पदयात्रा सोहळा आयोजित करण्यात आला होता.**



या पालखी पदयात्रा सोहळ्याचे किनगाव बाजार समितीच्या आवारात स्वागत करण्यात आले. यावेळी भुसार व्यापारी सतीश मल्हारराव गडे व प्रा. तुषार गडे यांच्या वतीने पदयात्रेतील शेकडो साई भक्तांना मलई दुधाचे प्रसाद म्हणून ही वाटप करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे निरीक्षक एन.पी. बारी, कर्मचारी आवारातील कांदा व्यापारी, भुसार व्यापारी, तसेच आयोजक पालखी पदयात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष संजय पाठक, पालखी अध्यक्ष राहल कोळी, हिरालाल सोनार, गणेश सुरळकर, हर्षल मोरे, अनिल कोळी, बाळा कोळी, सागर महाजन, पंकज कोळी, प्रविण बारी, तुषार कोळी, सागर कोळी, बापू कोळी यांच्यासह परिसरातील शेकडो साईभक्त या पालखी पदयात्रेत सहभागी झाले होते. ठिकठिकाणी पालखीचे स्वागत करण्यात आले.

**गेल्या १४ वर्षांपासून ही पालखी पदयात्रा किनगाव मार्गे जात असल्याने बाजार समितीच्या आवारात दरवर्षी स्वागत करण्यात येत आहे. सदर दिंडी संध्याकाळी ६ वाजता रवाना होऊन धानोरा येथे पहिला मुक्काम करून वेले, अमळनेर, फागणे, झोडगे, चौंडी जळगाव, सावरगाव, कोपरगाव येथे रात्री मुक्काम करून दि. ३१ डिसेंबर रोजी श्री साईनाथ बाबा धर्मशाळा व शिर्डीचे साईबाबा मंदिर येथे पोहोचणार आहे.**

## प्रा. उन्नती चौधरी यांना नारीरत्न पुरस्कार



**प्रतिनिधी । रावेर**

खिरोदा येथील प्रा. उन्नती संजय चौधरी यांना साहित्य क्षेत्रातील नवोदित लेखिका म्हणून 'नारीरत्न' पुरस्कार प्रदान) वसुनंदिनी फाउंडेशन जळगाव आणि एम. के. वेंचर्स जामनेर या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव येथे देऊन सन्मानित करण्यात आले. धनाजी नाना महाविद्यालय फैजपूर, मराठी विभागातील वसुनंदिनी फाउंडेशनतर्फे प्रा.उन्नती चौधरी यांनी साहित्य आणि समाजसेवा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'नारीरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार सोहळ्याचे आयोजन वसुनंदिनी फाउंडेशनचे अध्यक्ष विद्याधर सोनवणे आणि एम.के. वेंचर्सचे अध्यक्ष माधुरी कुलकर्णी यांनी केले होते.

## अमळनेर नगरीचा विकास हाच आपला एकमेव ध्यास, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.परिक्षीत बाविस्कर

**प्रतिनिधी । अमळनेर**

**नगरपालिकेत शिवसेनेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.परिक्षीत बाविस्कर हे माजी आ.शिरीष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रचंड बहुमताने आपल्या पॅनल व पुरस्कृत उमेदवारांसह निवडून आल्याने त्यांचा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी नुकताच आशीर्वाद देऊन पुढील कार्यासाठी शुभकामना दिल्या.**

वैद्यकीय सेवेत सामाजिक बांधिलकी जोपासत निरपेक्ष भावनेने अव्याहतपणे कार्य करीत असतांना डॉ.परिक्षीत बाविस्कर यांना जन्मभूमीत काय चांगल करता येईल या भूमिकेत असताना लोकनियुक्त नगराध्यक्ष पद एसटी राखीव निघाल्याने

### • पालकमंत्री ना.गुलाबरावजी पाटील यांनी केले कौतुक



नम्र,स्वच्छ,सकारात्मक कार्य करणारा व्यक्ती म्हणून माजी आमदार शिरीष चौधरी यांनी त्यांना उमेदवारी दिली. अमळनेरकर जनतेने तत्यांना भरघोस मतांनी निवडून आणले. डॉ.परिक्षीत यांच्या अर्धांगिनी डॉ.सौ.स्वातीताई यांचंही डॉ.परिक्षीत यांच्या सारखं साधारण राहणं, वागणं तसेच कुणावरही टीका टिपणी न करता काय चांगल करता येईल या विचाराने प्रेरित असल्याने शिरीष चौधरी यांना मानणारा परिवार, शिवसेना कार्यकर्ते, पदाधिकारी, मातृह्रदयी अमळनेरकर जनता या सर्वांच्या पाठबळावर बहुमताने निवडून आल्याने लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.परिक्षीत बाविस्कर हे १ जानेवारी रोजी नूतन वर्षाच्या पहिल्या दिवशी लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून पदग्रहण करणार असून डॉ.बाविस्कर यांचे एकमेव ध्येय अमळनेरचा सर्वांगीण विकास हेच असल्याने ते अमळनेरचा चेहरा-मोहरा बदलतील.

## पारोळ्यात पत्रकार संघ सभागृहाचे भूमिपूजन उत्साहात

### • आ.अमोल पाटील यांच्या प्रयत्नांनी २० लाखांचा निधी झाला मंजूर

**प्रतिनिधी । पारोळा**

येथील। श. प्र. येथील लोकदर्पण पत्रकार असोसिएशनच्या गेल्या अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या सभागृहाच्या मागणीला अखेर न्याय मिळाला आहे. आमदार अमोल पाटील यांच्या ठोस आश्वासन व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पत्रकार संघाच्या सभागृह बांधकामासाठी २० लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आज या सभागृहाच्या कामाचे भव्य भूमिपूजन आमदार अमोल पाटील यांच्या शुभहस्ते पार पडले. याच कार्यक्रमात लोकदर्पण पत्रकार असोसिएशनतर्फे नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील तसेच नगरसेवकांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी गराध्यक्ष गोविंद शिरोळे, लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, जेष्ठ पत्रकार बाळासाहेब पाटील, भूपेंद्र मराठे, पारोळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक पवार यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक, शिवसेनेचे आजी-माजी पदाधिकारी, शिवसैनिक, इतर स्थानिक स्वराज्य संस्थाचे आजी-माजी पदाधिकारी, सदस्य, लोकदर्पण पत्रकार असोसिएशनचे आजी-माजी पदाधिकारी, सदस्य, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या




संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना आ.अमोल पाटील म्हणाले, लोकशाहीचा चौथा स्तंभअसलेल्या पत्रकारांच्या सन्मानासाठी उभारले जाणारे हे सभागृह संविधान, सत्य, निर्भीडता व जनतेच्या प्रश्नांचा आवाज अधिक बुलंद करेल. अनेक वर्षांपासून पत्रकार बांधवांनी ही मागणी सातत्याने लावून धरली होती. अनेकांनी केवळ पोकळ आश्वासने दिली; मात्र दिलेला शब्द पूर्ण करून ही मागणी प्रत्यक्षात साकारण्याचे भाग्य मला लाभले, याचे मनापासून समाधान आहे. हे सभागृह केवळ इमारत नसून पत्रकारांच्या विचारांना, संघर्षाला व स्वाभिमानाला मिळालेली ओळख आहे.

**शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकदिलाने व एकमताने काम करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. हा सोहळा म्हणजे पत्रकारिता, लोकशाही व विकासाचा त्रिवेणी संगम असून, येत्या काळातही लोकदर्पण पत्रकार असोसिएशनच्या कार्यासाठी सदैव कटिबद्ध राहणार असल्याचे मत आमदार अमोल पाटील यांनी आपल्या मनोगतातून स्पष्ट केले.**

## शिवसेना उबाठा शहर प्रमुख महेंद्र भोई यांचा राजीनामा

**प्रतिनिधी । चोपडा**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला चोपडा शहरात मोठा धक्का बसला असून शहर प्रमुख महेंद्र मोहन भोई यांनी आपल्या पदाचा तसेच प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी याबाबत पक्षाच्या वरिष्ठांकडे लेखी स्वरूपात राजीनामा सादर केला आहे.

महेंद्र भोई हे गेल्या १५ ते २० वर्षांपासून शिवसेनेचे सक्रिय कार्यकर्ते म्हणून कार्यरत होते. चोपडा नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांनी नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

मात्र त्या वेळी पक्षाकडून तसेच वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडून अपेक्षित सहकार्य व पाठबळ न मिळाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पक्षाच्या या दुर्लक्षामुळे निवडणुकीत पराभव पत्करावा लागल्याचे त्यांनी राजीनाम्यात नमूद केले आहे.

पक्षातील अंतर्गत नाराजी आणि कार्यकर्त्यांकडे होत असलेले दुर्लक्ष यामुळेच हा निर्णय घेतल्याचे भोई यांनी स्पष्ट केले. त्यांच्या राजीनाम्यामुळे चोपडा शहरातील शिवसेना उबाठा पक्षाच्या संघटनात्मक स्थितीवर परिणाम होण्याची चर्चा सुरू झाली आहे.